
८८ वे

# अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन

सोलापूर

१९ व २० जानेवारी २००८



अध्यक्षीय भाषण : श्री. रमेश देव

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई.

माझ्या रसिक मित्र बंधुभगिनींनो, नमस्कार !

मी कोल्हापूरचाच. माझ बालपण, तारुण्य, कोल्हापूरात गेलं. कोल्हापूर ही माझी कर्मभूमी, मी जे कर्म केलं म्हणजे कलेची सेवा केली त्याच फलित आता मला सोलापूरात मिळतयं. ८८ व्या नाट्यसंमेलनाचा अध्यक्ष करुन तुम्ही मला जो आनंद, प्रेम, मान आणि उत्साह दिला त्याबद्दल मी आपला सर्वांचा अत्यंत आभारी आहे !!!

मला वाटंत माझ्या वयाच्या १३-१४ व्या वर्षी मी प्रथम सोलापूरात आलो. माझी लाडकी मोठी बहीण इंदू हिचा विवाह श्री. मोहनसिंह बंकटसिंह बायस ांच्याबरोबर सोलापूरातल्या चौपाड्यात खूप थाटामाटात झाला. वरातीत मी घोड्यावर बसलो होतो. माझ्या पुढे बँड चालला होता. माझ्या मागून बँडचे एक पथक चालले होते. आतषबाजी जोरात चालली होती. मागून येणाऱ्या गाडीत नवरा नवरी नटून थटून बसले होते. मोहनसिंहच्या परिवारातल्या पुष्कळ बायका, पुरुष वरातीत होते. पैसे फेकले जात होते आणि त्यावेळी माझ्या हातात रूपयाच एक नाणं येऊन पडलं. मला खूप बर वाटलं आणि मग मी पैसे घेण्यासाठी हात पुढे करत राहिलो. आणि मग तो एक चाळाच सुरु झाला माझा. जसा पहिल्या पावसाच्या वेळी आनंदाने प्रत्येक थेंब हातात घेण्याचा आपण चाळा करतो तसा. त्या क्षणी मी सोलापूरच्या प्रेमात पडलो आणि योगयोग कसा बघा, माझ्या मोठ्या बंधुनीही सोलापूरातल्याच मुलीशी प्रेमविवाह केला. त्यामुळे सोलापूराच्या फेऱ्याही वाढल्या आणि प्रेमही वाढलं. सिद्धेश्वराचं मंदिर, त्यासमोर असलेला तो सुंदर तलाव आणि त्याला लागून असलेला भव्य किल्ला ही माझी आवडीची स्थळं आहेत. किल्ल्यात तासन्तास भटकणे हा माझा छंद होता आणि आहे. ह्याच किल्ल्यात मी शुटींगही केलं. इतकच नव्हे तर मी अजिंक्य थियेटर्स ही नाट्य संस्था सुरु केली आणि त्या संस्थेतर्फे फोन नं. ३३३३ या नाटकाचा पहिला प्रयोग सोलापूरातच भागवत थियेटरमध्ये केला आणि तो सोलापूरकरांनी यशस्वी केला आणि माझी नाट्यसंस्था यशस्वीपणे सुरु झाली.

सोलापूर ही सिध्देश्वराची कृपा असलेली पुण्यनगरी. श्री. रा. ना. पवार, कवी संजीव आणि त्र्यं. वि. सरदेशमुखांची कर्मभूमी. रगेल आणि रंगेल लावण्यांनी पुर्ण महाराष्ट्राला मोहवून टाकणारे शाहीर रामजोशी सोलापूरचेच. त्याचप्रमाणे डॉ. कोटणीस ह्यांनी सोलापूरचं नाव फक्त भारतातच नव्हे सगळ्या जगभर नेलं. डॉ. कोटणीस व

शाहीर रामजोशी ह्या दोघांच्या जीवनावर चित्रमहर्षी शांतारामबापूंनी चित्रपट काढले. सोलापूरने चित्रपटसृष्टीला कलाकारही दिले. पहिली सोलापूरातली मराठी कलावती शीला शुक्ल ह्यांनी सोहराब मोदी यांच्या पृथ्वीवल्लभ व त्यांच्या अनेक चित्रपटांत काम केली. ज्यांनी हिंदीत खलनायिकेच्या भूमिकेत आपला ठसा उमटवला त्या शशीकलाबाई सोलापूरातल्याच आणि त्यांना चित्रपटसृष्टीत आणलं शीला शुक्ल यांनी. आपल्या सुरेल आवाजाने मराठी रंगभूमी व्यापून टाकणाऱ्या फैय्याज ह्याही सोलापूरच्याच आणि मराठी रंगभूमी व चित्रपटांना वेगळे वळण देणारे डॉ. जब्बार पटेल ज्यांचा मराठी चित्रपटसृष्टी व रंगभूमी यशस्वी करण्यात सिंहाचा वाटा आहे.

आणि त्याच श्री सिध्देश्वराची कृपा असलेल्या पुण्यनगरीत मला नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद भूषवण्याचा जो बहुमान मिळाला हे माझ भाग्य आहे. आणि म्हणूनच मी आपल्याला प्रेमाने सांगतो ‘आय लव्ह यु सोलापूर ॲंड रियली लव्ह यु सोलापुरकर.’

माझी ८८ व्या नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी बहुमतांनी निवड झाली. अनेक प्रतिक्रिया उमटल्या काही लोकांना असही वाटलं की, मी सिनेमातला तर हा रमेश देव नाट्यसंमेलनाचा अध्यक्ष कसा? विशेषत: नवीन पिढीतील रसिकांना अस वाटणं शक्य आहे. कारण त्यांनी माझी नाटक पाहिली नाहीत हे माझ बॅड लक. तेव्हा मला सांगावस वाटतय की, माझ्या रक्तात नाटक आहे. माझ्या आजोबांनी आनंदीबाईच कारस्थान अर्थात ‘ध चा मा’ असं नाटक लिहलं होत व त्याचे त्याकाळी कोल्हापूर व सांगलीत काही प्रयोगही झाले होते. माझे वडील ॲडव्होकेट होते. कोल्हापूरच्या शाहु महाराजांचे लिगल ॲडवाइझर होते. त्यांना नाटकाची फार आवड होती. त्यांना गडकरी सेक्सपियर मुखोत्गत होते. अत्रे. पी. के व बाबुराव पेंढारकर हे त्यांचे मित्र होते. हे दोघेही आमच्या कोल्हापूरच्या घरी वारंवार येत असत. तेव्हा ते नाटकातील संभाषण अभिनय करुन एकमेंकाना ऐकवत असत.

माझ्या आजोबांनी मला माझ्या वयाच्या ११-१२ व्या वर्षी मेळ्यात काम करण्याची परवानगी दिली होती. आताच्या पिढीला मेळा म्हणजे काय हे माहित नसणार म्हणून थोडं सविस्तर सांगतो. मेळा म्हणजे बाल नाटकं व प्रायोगिक रंगभूमी यांची सुरुवात किंवा बाल्यावस्था असं म्हणावयास काही हरकत नाही . फरक फक्त इतकाच

की, प्रायोगिक रंगभूमीवर काहीतरी समस्या दाखवतात व त्यावरचा तोडगा. मेळ्यामध्ये ऐतिहासिक किंवा पौराणिक कथा असे. सर्व कामे मुलंच करत. मेळ्याचे प्रयोग गावातील चौका-चौकात होत. सेट बिलकुल नसे. जर जंगल दाखवायंच असेल तर छोटीशी झाडाची फांदी सेटवर ठेवत. महाल दाखवावयाचा असेल तर खुर्ची किंवा नक्षीदार खांब. मेळ्याच्या एका अंकानंतर मेळ्याचा मालक प्रेक्षकांमधून पैश्यांसाठी टोपी किंवा झोळी फिरवत असे व लोक एक पैश्यांपासून आठ आण्या पर्यंत पैसे टाकत. क्वचीत एखादा एक रुपया देत असे. एक रुपया म्हणजे फार मोठी रक्कम समजत. एक रुपया देणाऱ्यांचा स्टेजवर सत्कार केला जाई. सर्वांना कमाईतला अर्धा वाटा समसमान करुन वाटला जाई व अर्धा वाटा मालक स्वत:साठी ठेवत असत.

असो, मेळ्याच्या तालमीला मी जावू लागलो. तालीम जवळच असलेल्या वाड्याच्या एका खोलीत चालली होती. तीन ते चार दिवसानंतर आजोबा म्हणाले, “अरे रम्या, तालीम मास्तरांनी तुला काही शिकवले का?” “हो”, अभिनय करुन दाखवतो इति मी. थांब तुझ्या आजीला बोलावतो अस म्हणून त्यानी आजीला, माझ्या आईला, आमच्या सर्व नोकरांना बोलावल. इतकच नव्हे तर गल्लीतील लोंकानाही हाका मारुन बोलावलं. जवळ जवळ २०-२५ लोक आले. त्यांत काही बायका होत्या, मुलं होती . म्हणजे माझ्या कलेच्या पहिल्या प्रयोगाला हाउसफुल्ल गर्दी होती. माझे आजोबा आजीला म्हणाले नातवाला मेळ्यात घालू नका म्हणून डोंक खाल्लस आता त्याचा अभिनय बघून टाळ्या वाजवशील व त्याची दृष्टही काढशील. आजीने नुसतीस मान ठसक्यात हलवली. व्यवस्थित असलेला पदर पुन्हा व्यवस्थित केला आणि माझ्याकडे कौतुकाने पाहत हसली.

आजोबांनी मला बोलण्यास सांगितल. मी चारही बाजूला पाहिल. सर्वांच्या चेहऱ्यावर उत्सुकता होती. आईने हसत बोल म्हणून खुणावलं व माझ्या अंगात वेगळाच हुरुप संचारला मी तालीम मास्तरांनी सांगितल्याप्रमाणे पोज घेवून बोलण्यास सुरुवात केली. “अरे नीचा, नराधमा तुझ्या जिभेत जेवढा जोर आहे तेवढा तुझ्या हातात नाही. बडबड बंद कर नाहीतर तुझी जीभ एका झटक्यात कापून तुझ्या हातात देईन.” आजोबांनी टाळ्या वाजवल्या सर्वांनी टाळ्या वाजवल्या आईने हसून दाद दिली. आजी फार खूश झाली. ती म्हणाली छान बोलतोस. आणखीन काही येत असेल तर करुन

दाखव. मला एकदम तालीम मास्तरांची दोन वाक्य आठवली जी वाक्य ऐकली की काम करणारी मुलं एकदम चमकत व व्यवस्थित काम करु लागत. मी आजीला म्हटलं आजी मला आणखी येतंय! म्हणून दाखवू? ती हसली तिची संम्मती समजून मी तालीम मास्तर म्हणत असत ती वाक्यं म्हणावयास सुरुवात केली. आजोबा समोर बसले होते. जरा वाकून बसले होते. त्यांच्याकडे हात करुन म्हणालो. "अरे रांड लेका वाकून काय बसलास सरळ बैस". आजोबा एकदम चमकले, सरळ झाले, मला आनंद झाला. माझ्या वाक्याचा परिणाम झाला असं वाटल. आता मला नक्की आजोबांकडून चांगले बक्षीस मिळणार याची खात्री झाली. "काय म्हणालास तू?" इति आजोबा. मला जास्त हुरुप आला होता. आता जास्तच जोरात म्हणालो. "अरे रांड लेका वाकून बसला होतास ते सरळ बसलास शिंचीच्या, असाच बस". बक्षीसाच्या आशेने आजोबांच्या जवळ गेलो. जबरदस्त थोबाडीत बसली. मी भिंतीवर आदळलो. मी ओरडत होतो. आजोबा मला मारत होते. आजी व आई मला वाचविण्याचा प्रयत्न करत होत्या. आजी आजोबांवर ओरडत होती. आता का पोराला मारताय. त्याला मेळ्यात घालू नका म्हणून सांगितलं होत. ऐकल नाही. पोराला आणखी माराल तर माहेरी जाईन नातवाला घेऊन. नोकरांनी आजोबांना धरुन ठेवलं. आईला संधी मिळाली व ती मला घेऊन वरच्या खोलीत गेली. "अस बोलायच नाही, पुन्हा कधी अस म्हणू नकोस," आई मला बजावत होती व मी तिला आजोबांनी मला का मारल अस रडत रडत विचारत होतो. काय बोलू नको.... सांग मला.... आई सांगावयास जायची व थांबायची फक्त म्हणायची नाही.... अस नाही बोलायच. अस म्हणजे कस हे मला कळत नव्हत. आजोबांनी इतक का मारल हे मला कळत नव्हत. जरा मोठा झाल्यावर कळल की, मी केवढा गाढवपणा केला होता. रांड...लेका...कोंबडीच्या... हाल्या....ह्या शब्दांचा अर्थ मला माहित नव्हता. कारण हे शब्द आमच्या घरी मी कधीच ऐकले नव्हते. ही शिवी आहे हे देखील मला माहित नव्हत.... अर्थात त्यानंतर माझा मेळा थांबला.

मी मात्र ठरवलं होत ज्यांच्याकडून मी मार खाल्ला त्याच आजोबांकडून मी शाबासकी मिळवीन. ही संधी मला लवकरच मिळाली. माझ्या टोकदार नाकाने मिळवून दिली. आमच्या शाळेत 'गड आला पण सिंह गेला' हे नाटक बसवण्यास घेतले. माझ्या टोकदार नाकामुळे मला शिवाजीचे काम मिळाले. नाटकाच्या तालमी शाळेच्या वेळातच

होत. आजोबांना काहीच सांगितल नाही. फक्त आईला ठावूक होत. बरोबर १५ दिवसानंतर शाळेच्या गॅदरींगच्या दिवशी नाटक होत. नाटक पॅलेस थिऐटरमध्ये होते. नाटकाला शाळेतील मुले व काही पालकांना आग्रहाने बोलवलं होत. त्यात माझे आजोबा, वडील, आजी, आई, भाऊ बहीण हे सर्वजण होते. मी व्हॉलेंटियर आहे अस सर्वांना सांगितले होते.

बाबांच्या (भालजी पेंढारकर) जाधव नावाच्या मेकअप मनने माझा मेकअप केला. शिवाजी महाराजांचे कपडे घातले. दोन घंटांनंतर धूप सगळीकडे फिरवला. भारून टाकणार वातावरण निर्माण झालं. आजदेखील तो दिवस मला चांगला आठवतो. धूपाचा वास सगळीकडे दरवळत होता. मी भारावून गेलो होतो. त्याच अवस्थेत मी स्टेजवर एंट्री घेतली. टाळ्यांचा, शिट्टयांचा कडकडाट झाला. आयुष्यातील स्टेजवरची पहिली एंट्री घेतली. पहिल्या कडकडून पडलेल्या टाळ्या...... मला स्फुरण चढलं डायलॉग बोलण्यास म्हणण्यास सुरुवात केली .... टाळ्याच टाळ्या .... मला त्यावेळी हे देखील माहीत नव्हत की हा मेकअप मला कायमचा चिकटणार आहे. हे स्टेज माझ जीवन होणार आहे. हया टाळ्या माझा श्वास होणार आहेत... हया आगळ्या वेगळ्या सुंदर जगात मी कायमचा रममाण होणार आहे.

नाटक संपल आजोबांनी प्रेमाने गालावर पाठीवर हात फिरवला.. मला समाधान मिळालं ह्याचं हातांनी माझ्या पाठीवर रट्टे पडले होत. सर्वांनी माझ कौतुक केल. मला खात्री होती, की मला पहिलं बक्षीस मिळणार पण तिसरं बक्षिस मिळालं. मी फार नाराज होतो. चिडलो होतो. आईने ओळखले. 'का चिडलास' म्हणून मला विचारले. "आई सर्वात जास्त टाळ्या मला मिळाल्या.... अगदी पहिल्या एंट्रीपासून शेवटपर्यंत प्रत्येक वाक्याला लोक व मुले मला दाद देत होती. पहिल बक्षीस मलाच मिळाल पाहिजे होते. मास्तरांनी दुजाभाव दाखवला. मला तिसरं बक्षीस दिल". मी चिडून म्हणालो आई हसली. व म्हणाली "नाटकात किती मुलांनी भाग घेतला". "जवळ जवळ २५ मुलांनी" – इती मी. "म्हणजे २२ मुलांना माहीच मिळाले नाही, होय ना". मी नुसतीच मान हलवली. "हे बघ रमेश २२ मुलांना काहीच मिळाले नाही तुला कमीत कमी तिसरं का होईना बक्षीस मिळाल, पण तू त्यांचा आनंद घेत नाहीस, उलट तू दु:खी आहेस. जे मिळालय त्यांचा आनंद न घेता जे मिळाल नाही त्यासाठी तू

दु:ख करतोस. अस करु नकोस.... जे आज मिळाल आहे त्याच पुरेपूर आनंद घे व जे मिळाल नाही ते मिळविण्याची जिद्द बाळग.. ती मिळविण्यासाठी पराकष्टाने प्रयत्न कर"... ह्या आईच्या उपदेशाने माझी चूक माझ्या लक्षात आली. मला मिळालेल्या चांदीच्या छोट्याशा पेल्याकडे माझं लक्ष गेलं. तो पेला चमकत होता. मी हसू लागलो. आई माझ्याकडे पाहत मंद स्मित करत होती. माझ्या आईच्या एका वाक्यानं "जे आज मिळालय त्यांचा पुरेपूर आनंद घे व जे मिळालं नाही त्यासाठी जिद्दीने प्रयत्न कर... तुला ते उद्या नक्की मिळेल". ह्या एका वाक्यानं माझ सारं आयुष्य उजळून निघालं. त्यामुळे जे मला मिळावयास पाहिजे होते ते मला मिळाले नाही... त्याच दु:ख मी करत कधीच बसलो नाही. उलट ते मिळविण्यासाठी मी प्रयत्न करत राहीलो. त्यामुळे मी सदोदीत कार्यरत राहिलो... कार्यरत राहिलो म्हणून तब्बेतही उत्तम राहिली व तब्बेतीने उत्तम राहीलो. म्हणूनच ह्या वयात सुदधा तुमच्या समोर मी उभा आहे.

त्यावेळी जो माझ्या चेहऱ्याला रंग लागला व ज्या पवित्र व बहुवेधी रंगमंच्याशी माझ नात जडलं ते परमेश्वराच्या कृपेने व आपल्या सारख्या रसिकांच्या अलोट प्रेमामुळे आजपर्यत कायम आहे. तेच नातं माझ्या शेवटापर्यत कायम राहवं ही आपल्याकडे व परमेश्वराकडे अनन्य भावे प्रार्थना.

रंगभूमी.... नाट्यकला... ही जिवंत रसरसलेली कला आहे. तारुण्याचा जोश त्यात आहे. अनुभवाची परिपक्वता त्यात आहे.... आदी मानवाने बोलण्याआधी हावभाव करत आपले विचार सांगण्यास सुरुवात केली म्हणजे नाट्य-कलेची सुरुवात झाली. ही कला अनादी काळापासुन सुरु झाली.... अनादी काळापर्यत चालणार आहे किंबहुना विश्वाच्या शेवटापर्यत ही कला राहणार आहे.

हे विश्व ब्रम्हदेवाने निर्माण केले. आम्ही रंगकर्मी (म्हणजे लेखक, स्टेजवर काम करणारे, स्टेजपाठीमागे काम करणारे, संगीतकार, नृत्यकार वगैरे) आमचं एक वेगळ विश्व निर्माण करतो. हे फक्त ४०X५० एवढ्याच जागेत असत. पण त्याचा आवाका विश्वाला कवेत घेणारा असतो. ह्यात कधी आजची समस्या असते तर कधी इतिहास दर्शन असते. कधी पुराण काळाचा वेध असतो...तर कधी ह्यात भविष्यकाळाची स्वप्ने रंगलेली असतात. हे विश्व आम्ही निर्माण करतो. पण ते तुमच्या प्रेक्षकांच्यासाठी असते. तिसरी घंटा होते. रंगमंच्यावर धुपाचा सुगंध पसरतो. एक

पवित्र वातावरण निर्माण होते. नाट्य गृहामध्ये हळुहळू अंधार होऊ लागतो... पडदा सरकू लागतो.... आमचं तुमच्यासाठी निर्माण केलेले विश्व प्रकाशमान होऊ लागते. तुम्हाला नकळत तुम्ही आमच्या विश्वात समरस होऊ लागता.... कधी हसता... कधी दु:खात रडता... कधी चिंतन करता तर कधी भविष्यात रममाण होता. आमच्या ह्या विश्वाच यश ... या विश्वात तुम्ही किती रममाण होता यावर अवलबुंन असतं तुम्ही पूर्णपणे स्वत:ला विसरुन ह्यात रममाण झालात तर आम्ही यशस्वी... नाही झालात तर आम्ही अयशस्वी... आमचे हे विश्व सर्वस्वी तुमच्या संमतीवर अवलबुंन असते. आमचं हे विश्व नाटक तुम्हाला पसंत पडल की आमच्या आनंदाला उधाण येत... जोरात दौरे सुरु होतात... गावोगावी भटकण सुरु होतं... अक्षरश: रात्रीचा दिवस व दिवसाचा दिवसच करत असतो. विदर्भ, मराठवाडा, गोवा, कोकण इथे पहाटे दोन पर्यंत नाटकं चालत. २॥ वाजता कुठल्यातरी हॉटेलात थंडगार गारगोट जेवण जेवतो... पण जेवत असताना मनात समाधान असतं. कारण संपुर्ण नाटक तुमच्या टाळ्या... तुमचे हसे... आम्ही ऐकत असतो. आमचे संवाद तुम्ही ऐकत असता व त्याचवेळी तुमचे हशे... टाळ्या ऐकण्यासाठी आम्ही आसुसलेले असतो. ह्या टाळ्यांचा व हश्यांचा हक्कदार नटच नसतो तर लेखक असतो. सेट लावणारा... डिमरवर बसणारा.... टेप रेकार्डर चालवणारा... पडदा उघडणारा.. व पडदा पाडणारा देखील असतो. आम्ही सर्वजण जीवांच रान करत असतो ह्या हश्या व टाळ्यांसाठी व नंतर पैशांसाठी... आमच्या वेळी तर परिस्थिती फारच वाईट होती. शहरं सोडली तर जवळ जवळ सर्व ठिकाणी खानावळीत ११ वाजता जेवणाच ताट वाढून ठेवत.. त्याच्यावर दुसरं रिकाम ताट किंवा रद्दी पेपर झाकुन ठेवत. ते झाकण – ताट किंवा पेपर दूर केला की, त्यातुन झुरळं पळत. त्यांच्या लेंड्या टिचकीन ताटाच्या बाहेर टाकून ते थंडगार अन्न अधाश्यासारखं खात असु. कारण पोटात आग पडलेली असे. हे अन्न आनंदाने खात असु कारण तुम्ही आम्हाला भरभरुन टाळ्या, हशे व पैसे दिलेले असत. दुसऱ्या दिवशी प्रवास किती लांब ठावुक नाही. प्रशांत दामलेनी गिनिज बुकमध्ये नाव नोंदविले. नाव नोंदविण्यासाठी प्रचंड कष्ट केले. छाती फुटेपर्यंत बडबडला... गायला ... बालगंधर्व पाच पाच वन्स मोअर घेत असत...तुम्हाला आनंद मिळे... त्यांची छाती फुटे... आज भरत जाधव हेच करतोय . दिवसाला दोन दोन प्रयोग करतो...वर शुटींगही करतो. हे

फक्त पैशासाठी नाही तर तुमच्या टाळ्या व हशे, तुमचे प्रेम मिळविण्यासाठी. बऱ्याचशा स्त्री कलाकारांना बरेचदा आपले दीड महिन्याचे तान्हं मुल घरी सोडुन नाटकासाठी बाहेर जावं लागत.

माझ्या बायकोने, सीमाने अजिंक्य दीड महिन्यांचा असताना १० दिवसांचा नाटकांचा दौरा केलाय. दौऱ्याला निघताना अजिंक्य झोपला होता. सीमा रडत होती . मी तिच्या आईची भेदक दृष्टी चुकवत होतो. रात्री ती रडायची. मी तिची समजुत काढत असे व ती माझी. माझ्या आईची चिता थंड होण्याआधी माझा असाच १५ दिवसांचा नाटकांचा दौरा होता त्यासाठी मी गेलो होतो... बाल गंधर्वांना नाटकाचा प्रयोग चालु होण्याच्या आधी फक्त दहाच मिनिटे आधी त्यांचा मुलगा गेल्याच कळलं. त्यांनी त्या नाटकाला... त्यांच्या गाण्याला नेहमीपेक्षा जास्त वन्स मोअर घेतले. हा निर्ढावलेपणा नाही तर जबाबदारी आहे. पुर्वी काय किंवा आता काय आमच्या नाटकांचे दौरे हिच आमची कमाई आहे, आमच जीवन आहे. दौऱ्याच्या वेळी तर प्रत्येक वळणावर मृत्यू आमची वाट पाहत असतो. तुमच्या साखर झोपेची वेळ. हीच सुंदर वेळ साधून मृत्यू आमच्यावर झडप घालतो. माझ्या माहिती प्रमाणे पहिली झडप शाहीर अमर शेखवर काळानं घातली....... काळाला ....... मृत्यूला जणु चटकच लागली ...... त्याच पहाटेच्या साखर झोपेच्या वेळी शांताबाई जोग, हार्डीकर व दोन बॅक स्टेज आर्टिस्ट यांच्यावर झडप घातली. खंदा आर्टिस्ट अरूण सरनाईक, त्याची पत्नी, मुलगा म्हणजे सगळं कुटुंब त्यान गिळंकृत केलं ...... भक्ती बर्वेला अलगद आमच्यातून उचलल. आमचे (माझी पत्नी व मी) पाच ॲक्सिडेंट झालेत त्यात दोन अपघातातून आम्ही कसे वाचलो ते परमेश्वरालाच माहीत ...... एकदा तर मृत्यूला मी समोर प[illegible] सेंकद पाहत होतो. आमच्या नाटकाच्या बसला अपघात झाला. ती बस तीनदा पुर्णपणे रोल झाली. आमच्या दोघांचा घास घेण्यासाठी मृत्यू आमच्याकडे अती वेगाने येत होता. परमेश्वराला आमच्या दोन्ही मुलांची काळजी ....... वाचलो ....... तुमच्या प्रेमामुळे वाचलो... हे सांगतोय ते माझ्या प्रिय रसिकांनो तुमची सहानुभुती मिळावी म्हणून नाही तर सत्य तुम्हाला कळाव म्हणून. अस पुष्कळ कलावंताच्या बाबतीत घडलय ....... घडत राहणार आहे ....... मात्र आमची रंगभूमीशी असलेली बांधिलकी कधीही संपणार नाही.

कलाकार सर्व दु:ख सर्व काळज्या दूर सोडून नाटक करतो. सिनेमात काम करतो ...... तमाशात नाचतात ...... सिरियल मध्ये काम करतात ...... ते फक्त पैश्यांसाठी नाही; त्रिवार नाही. तुमच्या प्रेमासाठी ... तुमच्या टाळ्यांसाठी ...... वाहव्वांसाठी, तुमची करमणूक करण हीच आमची करमणूक. दुसरी करमणूक म्हणजे दुसऱ्याचं नाटक पाहणं ... सिनेमा पाहणं... फिरावयास जाण... हे आम्हाला फारस जमतच नाही आणि एक दिवस लक्षात येत की आपल्या जागी दुसऱ्या उभरत्या कलाकाराला घेण्याचा विचार चाललाय. हिरो-हिरॉईन कॅरेक्टर आर्टिस्ट होतो. कॅरेक्टर आर्टिस्ट बाहेर फेकला जातो कारण त्याला थकवा येतो. प्रवास झेपत नाही. कारण त्याच वय झालय ....... पंचविशीचा कलाकार पन्नाशीचा झालाय व पन्नाशीचा कलाकार पासष्टीचा झालाय.

जगातील हा एकमेव व्यवसाय की ज्यात अनुभवाला, वयाला किंमत नाही. तर तो शाप आहे. डॉक्टर, इंजिनियर, ऑफिसात नोकरी करणारे ह्या सर्वांच वय होत... अनुभव वाढतो तसा फायदा होतो, त्याची बढती होते. तर कलाकार खाली ढकलला जातो. पुर्वी जीवाच्या आकांताने केलेली कामे आता जीवावर उठलेली असतात. काही ना काही आजार घेवून येतात ९०% लोकांना स्पांडेलेसीस, सांधे दुखणे, हार्टचे दुखणे, रक्तदाब, अस काही ना काही झालेले असतं.

मिळकत कमी झालेली असते व खर्च वाढलेला असतो. आजार, संसार वाढलेला असतो. मुलं-बाळ,त्याचं शिक्षण, साठवलेला पैसा किती दिवस टिकणार. मुलं चांगली निघाली तर ठिक, नाही तर आजाराला तोंड कस द्यायचं. मोठ्या नावाच्या चांगल्या हॉस्पीटलमध्ये जाण्याचा विचारसुध्दा करवत नाही. किंबहूना करता येत नाही. कारण पैसा हजारोंत दिल्याशिवाय तिथे प्रवेश नसतो व लाखात बिल भरल्याशिवाय तिथून बाहेर पडता येत नाही.

इथे मला माझ्या एक वर्षाच्या कारकिर्दीत कार्य करावस वाटतं. माझ्या कलाकरांसाठी, माझ्या नाट्य कर्मीयांसाठी, भले ते नाटकातले असोत ...... सिनेमातले असोत ........ किंवा सिरीयल मधले असोत किंवा तमाशातील असोत ...... ह्या सर्वांच्या प्रकृतीसाठी मला एक अत्याधुनिक हॉस्पीटल बांधण्याची इच्छा आहे. कृपा करुन माझ्या रसिक मित्रांनो मला हसू नका. तुमच्याच प्रमाणे मलाही माहीत आहे की हे

एका वर्षात करणे अशक्य आहे. पण कमीत कमी ह्या कल्पनेला चालना तर देवू शकतो. या कल्पनेची मुहुर्तमेढ तर उभी करु शकतो. कोल्हापूरातील प्रचंड मोठं, अती सुंदर अंबाबाईच मंदीर दोन देवदुतांनी एका रात्रीत बांधून काढल अशी आख्यायिका आहे. मी देव नाही पण आडनावानं देव आहे. कमीत कमी या कल्पनेला चालना तरी देवू शकतो. आपण सर्वांनी एक होवून जर ही मागणी केली तर ते शक्य आहे. एकीची ताकद प्रचंड आहे व महाराष्ट्र सरकार कलाकारांवर मनापासून प्रेम करणारे आहे. ही मागणी एका कलाकारासाठी नाही तर समस्त इंडस्ट्रीसाठी आहे. यात नाट्य-कर्मी, सिनेमाचे, टी. व्ही. सिरीयलचे, तमाश्यांचे, समस्त लोकं आले. आपण सर्वजण मिळून वर्षाबंगल्यावर जावून महाराष्ट्र सरकारला विनंती करु की आम्हाला हॉस्पीटलसाठी जागा द्या.

आणखी काही गोष्टीसाठी मी प्रयत्न करणार आहे. नाट्य संम्मेलन होतं. चित्रपट संमेलन होत. तमाश्यांचे संमेलन होत. अजून टी.व्ही. सिरीयल लोकांचे संमेलन झालेल मला माहित नाही. प्रत्येक जण आप-आपले अस्तित्व टिकवून आहे. फार चांगली गोष्ट आहे. खर तर या सर्व शाखा, कलेच्या एका वटवृक्षाच्या फांद्या आहे. किंवा अस म्हणणं रास्त होईल की वटवृक्षाच्या पारंब्यापासून निर्माण झालेली झाड आहेत तस पाहिल तर नाटकांतील सर्वजण सिनेमात आहेत. सिनेमातील नाटकात...... सिरीयलमधील सिनेमात... तमाश्यात... म्हणजे हा एक सुंदर गोफ आहे. मग या सर्वांच एक संमेलन का असू नये. म्हणजे प्रत्येकाने आप-आपल संमेलन कराव. पण दोन किंवा तीन वर्षातून एकदा सर्वांनी मिळून एक संमेलन कराव. आपण आनंदाच्या वेळी एकत्र येवू , अडचणीच्या वेळी एकत्र येवू . आपल्या सर्वांची ताकद कितीतरी पटीने वाढेल. मी पहिला नाट्य संमेलनाचा अध्यक्ष आहे की जो नाटकातही सक्रीय होता. सिनेमात आहे व टि.व्ही. सिरीयलमध्येही आहे. म्हणून मी हे सुचवित नाही तर हे योग्य आहे व ही ह्या काळाची गरजही आहे.

सध्या नाट्य व्यवसाय थोड्या अडचणीतून चाललाय. काही नाटकं फार जोरात चाललीत. थोडी काठावर चाललीत. म्हणजे तोटा नाही पण फायदाही जास्त नाही. पण ८०% नाटकं तोट्यात चाललीत. आज ना उद्या आपल नाटक छान चालेल. या आशेवर प्रोड्यूसर नाटक लावतोय ...... जगतोय...... खर तर कलेची इंडस्ट्री

आशेवर जगते. आमच्या वेळीही अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. त्या वेळी यशवंत पगार या निर्मात्याने फारच चांगला तोडगा शोधला होता. त्याने तीन-दोन-एक असे तिकिट दर ठेवून नाटक लावण्यास सुरुवात केली. जनता नाटक म्हणून ती नाटकं प्रसिद्ध झाली. त्याला फार चांगला प्रतिसाद मिळाला. नाटकं हाऊस फुल्ल गर्दीने चालू लागली. आम्ही सर्व नाट्य-कर्मी अशा नाटकांना नेहमीपेक्षा थोडे पैसे कमी घेत असू. जाहिरातवाले म्हणजे वृत्तपत्रे देखील जाहीरातीत थोडे कन्सेशन देत ह्या सर्व गोष्टीमुळे नाटकं चालू लागली. त्यांची संख्याही वाढली. त्यामुळे नाट्य-कर्मीचा फायदाच झाला. असाच प्रयोग आता करण्यास काय हरकत आहे. सध्याचा तिकिट दर सर्वसामान्य नाट्य-प्रेमींना न परवडणारा आहे. जर तिकीट दर कमी केले तर मला वाटत नाटकं चालतील. अर्थात नाट्य-कर्मीनी थोडे-थोडे पैसे कमी करावेत. बॅक-स्टेज आर्टिस्ट सोडून सर्वानी. आपण सर्वांनी मिळून जर आवाज उठवला तर पेपरवाले, थियेटर्स त्यांचेही दर कमी करतील. पुर्वीही त्या लोकांनी दर कमी केले होते, आताही करतील. ही सवलत फक्त जनता नाटकांना मिळावी.ज्यांची नाटक जोरात चालतीत त्यांनी दर कमी नाही केले तरी चालेल. त्यांना सवलतही मिळणार नाही. फक्त जनता नाटकांसाठी ही सवलत असेल. हल्ली पुष्कळशी थियेटर्स त्या-त्या गावच्या म्युनिसिपल कार्पोरेशनची असतात. तेव्हा तिथल्या पुढाऱ्याची व प्रतिष्ठीत नागरिकांची मदत घेतली तर हे सहज शक्य आहे.

मित्रांनो या माझ्या एका वर्षामध्ये काय-काय करायचे त्या योजना आहेत. तुम्ही माझ्या प्रिय रसिकहो ....... प्रिय रंगकर्मी हो ....... तुम्ही म्हणाल एका वर्षामध्ये हे सर्व करणे अशक्य आहे. मी ठामपणे म्हणतो की, हे शक्य आहे. एक वर्ष म्हणजे तीनशे पासष्ट दिवस आणि तीनशे पासष्ट दिवस म्हणजे कमी नाहीत. मी फार आशावादी व कर्मवादी आहे. पण यासाठी आपण सर्व कलेची उपासना करणाऱ्यांनी...... कलेची पुजा करणाऱ्यांनी...... कलेवर जगणाऱ्यांनी एकत्र यावयास हवं...... जनतेचा आपल्याला आशिर्वाद आहे...... मदत आहे...... जनतेने कलाकारांना पूर्वीही मदत व आशिर्वाद दिला होता . आताही मदत व आशिर्वाद आहेत व पुढेही अनंत काळ आशिर्वाद व मदत करत राहणार आहेत. हे आपलं अजोड, अतुट, प्रेमाचं नातं असच कायमचं घट्ट राहणार आहे.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !!